# उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/आ.का./४४८/२०२१
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०२१

## : आदेश :

**विषय :- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण आणणेसाठी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रतिबंध लादणेबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. २७ नोव्हेंबर, २०२१**

ज्या अर्थी, सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी, वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

ज्या अर्थी, संदर्भिय शासन आदेश क्र. ३ अन्वये आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन शासनाकडून मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अधिकारामध्ये कोविड-१९ विषाणूचा फैलाव होण्यास पतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी लावण्याच्या संबंधातील राज्य शासनाच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन नव्याने तात्काळ प्रभावाने आदेशात मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत,

आणि ज्याअर्थी, **मा.मुख्य सचिव यांचे स्वाक्षरीने महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग यांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या आदेशात कोविड-१९ विषाणूचा फैलाव होण्यास पतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी लावण्याच्या संबंधातील राज्य शासनाच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन नव्याने तात्काळ प्रभावाने आदेशात सर्व आर्थिक,सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व मनोरंजनविषयक क्षेत्रातील कार्यांना कोविड-१९ सार्वत्रिक साथरोग येण्यापूर्वी, विविध स्थानिक किंवा इतर सक्षम प्राधिकरणांनी ठरविलेल्या सर्वसाधारण वेळानुसार, पुढील शर्तींना अधीन राहून, खुले करण्यात येत आहे असे निर्देश संदर्भ क्र. ३ अन्वये पारित केलेले आहेत.**

**त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबंधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे शासनाचे दिनांक २७ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे आदेश सर्व आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व मनोरंजनविषयक क्षेत्रातील कार्यांना कोविड-१९ सार्वत्रिक साथरोग येण्यापूर्वी, विविध स्थानिक किंवा इतर सक्षम प्राधिकरणांनी ठरविलेल्या सर्वसाधारण वेळानुसार, शासन आदेशात नमुद शर्तींना अधीन राहून, खुले करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये तात्काळ प्रभावाने जसेच्या तसे लागु करीत आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.**

तसेच दरम्यानच्या कालावधीत शासनाकडून अन्य कोणत्याही सूचना/आदेश प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे देखील बंधनकारक असेल.

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

**सहपत्र :- शासन आदेश क्र.कोरोना डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१**
**दिनांक २७ नोव्हेंबर, २०२१ (मराठी व इंग्रजी प्रत)**

२९/११/२०२१

**(डॉ.राजा दयानिधी, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे.
७. मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती प्रभाग समिती, सर्व गटनेता, सर्व सन्माननीय महापालिका सदस्य यांचेकडे माहितीसाठी.
८. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती/आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती/महसूल समिती/पाणी पुरवठा व मलनिस्सारण समिती/सार्वजनिक बांधकाम समिती/नियोजन व विकास समिती/पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती/गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती/क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती.
९. मा.पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - ४, उल्हासनगर.
१०. सहाय्यक पोलिस आयुक्त, उल्हासनगर/अंबरनाथ.
११. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर/मध्यवर्ती/विठ्ठलवाडी/हिललाईन/शिवाजीनगर पोलिस स्टेशन.
१२. जनसंपर्क अधिकारी, उ.म.पा. यांनी सदर आदेशाची उचित माध्यमांव्दारे जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी.
१३. अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त(मुख्यालय), सर्व उप आयुक्त, सर्व विभागप्रमुख, उल्हासनगर महानगरपालिका.
१४. सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालये.
१५. सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

**क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक: २७ नोव्हेंबर, २०२१**

## आदेश

---

**संदर्भ:**

अ. साथरोग अधिनियम, १८९७

व. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.

राज्य शासनाकडे गेल्या काही महिन्यांमध्ये कोविड-१९ पॉझिटीव्ह रुग्णांची नोंद, सातत्याने कमी प्रमाणात होत आहे. तसेच, देशातील व शेजारच्या राज्यांतील कोविड-१९ रुग्णसंख्येच्या आलेखामध्ये, निरंतर व सातत्याने घट होत आहे. आवश्यक निर्बंधांचे विविध आस्थापनांकडून कोविड-१९ विषयक निर्बंधाचे पालन करण्यात येत असलेल्या शिस्तीमुळे तसेच बहुसंख्य जनतेने कोविड अनुरूप वर्तन विषयक शिस्त वाळगण्यामुळे हे सर्व यश प्राप्त झाले आहे. राज्यातील व देशातील लसीकरण मोहिमेला देखील मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून आले आहे आणि त्यामुळे सार्वजनिक तसेच खाजगी आरोग्य विषयक पायाभूत सुविधांवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास हातभार लागला आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेता, राज्य शासन, आता आर्थिक, सामाजिक, मनोरंजन व सांस्कृतिक क्षेत्रावरील निर्बंध, पूर्णतः लसीकरण झालेल्या व्यक्तींसाठी उठवण्याचा विचार करीत आहे.

म्हणून, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली सही करणार, अध्यक्ष, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या राज्य कार्यकारी समितीचे अध्यक्ष, आपल्या आधिकारामध्ये, कोविड-१९ विषाणूचा फैलाव होण्यास पतिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी निर्बंध लावण्याच्या संबंधातील राज्य शासनाच्या यापुर्वीचे सर्व आदेशांचे अधिक्रमण करून, तात्काळ प्रभावाने असा आदेश देत आहे की, सर्व आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व मनोरंजनविषयक क्षेत्रातील कार्यांना कोविड-१९ सार्वत्रिक साथरोग येण्यापूर्वी, विविध स्थानिक किंवा इतर सक्षम प्राधिकरणांनी ठरविलेल्या सर्वसाधारण वेळानुसार, पुढील शर्तींना अधीन राहून, खुले करण्यात येत आहे.

**१. कोविड अनुरूप वर्तनाचे (Covid Appropriate Behaviour) पालन:**

राज्य शासनाने व केंद्र सरकारने वेळोवेळी निर्धारित केलेल्या कोविड अनुरूप वर्तनाचे (CAB), सेवा प्रदाते, परिवास्तूंचे (जागांचे) मालक, परवानाधारक, आयोजक, इत्यादींसह सर्वांनी तसेच सर्व अभ्यागत, सेवा घेणारे, ग्राहक, अतिथी, इत्यादींनी काटेकोर पालन केले पाहिजे. कोविड अनुरूप वर्तनाची तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे तसेच त्याचे उल्लंघन केल्यास करावयाचे दंड, कोविड अनुरूप वर्तनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि यात यापुढे नमूद केलेल्या दंडांनुसार असेल.

27/11/21

२. **संपूर्ण लसीकरणाची आवश्यकता:**

अ. तिकीट असलेल्या किंवा तिकीट नसलेल्या, कोणत्याही कार्यक्रमाच्या, समारंभाच्या किंवा प्रयोगाच्या आयोजनाशी संबंधित असलेल्या सर्व व्यक्ती तसेच सर्व सेवा प्रदाते व सहभागी होणाऱ्या व्यक्ती (जसे की, खेळाडू, अभिनेते, इत्यादी), अभ्यागत, पाहुणे, ग्राहक यांचे, यात यापुढे दिलेल्या व्याख्येनुसार, संपूर्ण लसीकरण केलेले असावे.

ब. जेथे जनतेतील कोणत्याही व्यक्तींना येण्याचा आणि सेवा घेण्याचा हक्क आहे असे कोणतेही दुकान, आस्थापना, मॉल, समारंभ, संमेलन (मेळावे), इत्यादी ठिकाणी, संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींद्वारे व्यवस्थापन केले पाहिजे आणि अशा ठिकाणी येणारे सर्व अभ्यागत, ग्राहक यांचे संपूर्ण लसीकरण झालेले असावे.

क. सर्व सार्वजनिक परिवहन सेवांमध्ये, संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींनाच परवानगी असेल.

ड. राज्य शासनाने तयार केलेला युनिव्हर्सल पास (https://epassmsdma.mahait.org किंवा telegram-MahaGovUniversalPass Bot) हा, संपूर्ण लसीकरण झाल्याच्या स्थितीचा वैध पुरावा असेल. अन्यथा, छायाचित्र असलेले वैध ओळखपत्र असलेले कोविन प्रमाणपत्र देखील त्यासाठी वैध पुरावा मानले जाईल. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या नागरिकांसाठी, इतर शासकीय संस्थेने किंवा शाळेने दिलेले छायाचित्र ओळखपत्र आणि वैद्यकीय कारणांमुळे ज्या व्यक्ती, लस घेऊ शकत नाहीत त्या व्यक्तींसाठी, प्रमाणित वैद्यकीय व्यावसायीकाकडील प्रमाणपत्र प्रवेशासाठी कागदोपत्री पुरावा म्हणून वापरता येईल.

इ. जेथे सर्वसामान्य जनतेतील कोणतीही व्यक्ती भेट देत नाही अशी कार्यालये व इतर आस्थापना तसेच खाजगी परिवहन सेवा यांच्यासाठी, संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींसाठी त्या खुल्या असण्याची शर्त नसली तरी, त्यांना देखील संपूर्ण लसीकरण करणे आवश्यक आहे.

३. **महाराष्ट्र राज्यात प्रवास:**

कोणत्याही आंतरराष्ट्रीय गंतव्यस्थानावरून राज्यात येणाऱ्या सर्व प्रवाशांचे, या बाबतीतील भारत सरकारच्या निदेशांद्वारे विनियमन करण्यात येईल. राज्यात येणाऱ्या सर्व देशांतर्गत प्रवाशांचे, एकतर यात यापुढे व्याख्या केल्यानुसार संपूर्ण लसीकरण केले जाईल किंवा ७२ तासांसाठी वैध असलेले आरटी-पीसीआर चाचणी प्रमाणपत्र ते बाळगतील.

४. **कोणताही कार्यक्रम, समारंभ, इत्यादींमधील उपस्थितीवरील निर्बंध:**

अ.चित्रपट गृह, नाट्यगृह, मंगलकार्यालय, सभागृह, इत्यादी बंदिस्त /बंद जागेत घेण्यात येणाऱ्या कोणत्याही कार्यक्रमाच्या/समारंभाच्या/ उपक्रमाच्या बाबतीत, जागेच्या क्षमतेच्या ५० टक्के लोकांना परवानगी दिली जाईल.

27/11/21

ब. संपूर्ण खुल्या असलेल्या (open to sky) जागांच्या बाबतीत, कोणत्याही समारंभांसाठी किंवा संमेलनांसाठी तेथील जागेच्या क्षमतेच्या २५ टक्के लोकांना परवानगी दिली जाईल. संमेलनाच्या किंवा समारंभाच्या अशा ठिकाणांच्या बाबतीतील क्षमता, औपचारिकपणे आधीच निश्चित केलेली नसेल तर (स्टेडियम प्रमाणे), संबंधित जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास, अशी क्षमता ठरवण्याचा अधिकार असेल.

क. जर वरील नियमांनुसार कोणत्याही संमेलनासाठी (मेळाव्यासाठी) उपस्थित असलेल्या एकूण लोकांची संख्या १ हजारांपेक्षा अधिक असेल तर, अशा बाबतीत, स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला त्याची माहिती द्यावी लागेल आणि स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अशा कोणत्याही संमेलनाचे (मेळाव्याचे) निरीक्षक म्हणून पर्यवेक्षण करण्यासाठी त्यांचे प्रतिनिधी पाठवील आणि तेथे वर नमूद केलेल्या नियमांचे काटेकोरपणे अनुपालन केले जात असल्याची खात्री करतील. कोविड-१९ च्या प्रसाराचा धोका लक्षात घेता, तेथे कोविड अनुरूप वर्तनाचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले तर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या उक्त प्रतिनिधीला, कार्यक्रम पूर्णत: किंवा अंशत: बंद करण्याचे आदेश देण्याचा प्राधिकार असेल.

**५. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे इतर वाजवी निर्बंध:**

कोणत्याही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास, जर योग्य वाटल्यास, कोणत्याही क्षणी, त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रासाठी, यात नमूद केलेले निर्बंध व शर्ती वाढविता येतील, परंतु कमी करता येऊ शकणार नाहीत, मात्र, जाहीर नोटीसीद्वारे ४८ तासांची पूर्व सूचना दिल्याशिवाय तसे करता येणार नाही. या आदेशाच्या दिनांकास, अंमलात असलेले जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने लादलेले कोणतेही निर्बंध, जर ते पुढे चालू ठेवण्यासाठी जाहीर नोटीस देऊन पुन्हा जारी केले नसतील तर, ते, ४८ तासांनंतर अंमलात असल्याचे बंद होतील.

**६. संपूर्ण लसीकरणाची व्याख्या:**

संपूर्ण लसीकरण झालेली व्यक्ती याचा अर्थ, -

- लसीच्या दोन्हीही मात्रा (डोस) घेतलेल्या आहेत आणि दुसरी मात्रा (डोस) घेतल्यानंतर १४ दिवस झालेले आहेत अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे; किंवा
- ज्या व्यक्तीचे वैद्यकीय स्थिती अशी आहे की, ज्यामुळे त्याला किंवा तिला लस घेण्यास मुभा नाही आणि त्या व्यक्तीकडे तशा अर्थाचे मान्यताप्राप्त डॉक्टराकडील प्रमाणपत्र आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे; किंवा
- १८ वर्षांपेक्षा कमी वयाची व्यक्ती, असा आहे.

**७. कोविड अनुरूप वर्तनविषयक नियम व दंड :-**

व्याख्या: कोविड १९ विषाणूचा प्रसार होण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यामुळे त्याच्या प्रसाराची साखळी खंडित करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने व संस्थेने पालन करण्याची गरज असलेले दैंनदिन सामान्य वर्तन अशी

27/11/21

कोविड अनुरूप वर्तन (CAB) या संज्ञेची व्याख्या करता येऊ शकेल. ज्यांचे कोविड अनुरूप वर्तन (CAB) म्हणून म्हणून वर्णन केले जाते आशा वर्तनाच्या पैलूंमध्ये, खाली नमूद केलेल्या वर्तनांचा समावेश होतो आणि कोविड १९ विषाणूचा प्रसार होण्यास जे अडथळा निर्माण करू शकतील अशा सर्व तर्कसंगत पैलूंचा देखील समावेश होतो, त्यात नमूद केलेली त्याच्या प्रसाराची कार्यपद्धती (methodology) दिलेली आहे.

मूलभूत कोविड अनुरूप वर्तनाचे काही पैलू पुढीलप्रमाणे असून त्यांचे प्रत्येकाने सदैव पालन केले पाहिजे. सर्व संस्थांनी हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की, त्यांचे सर्व कर्मचारी, त्यांच्या परिसरांत भेट देणारे अभ्यागत, ग्राहक किंवा संस्थेच्या कोणत्याही कार्यक्रमात, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, सहभागी होणारी कोणीतीही व्यक्ती, त्याचे पालन करतील आणि त्यांच्या परिसरांमध्ये आणि/किंवा व्यवसायाशी संबंधित व्यवहार करताना किंवा संबंधित संस्थेशी संबंधित असलेली अन्य कार्य करताना, त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता संस्था उत्तरदायी असतील. संस्था, त्यांच्या नियंत्रणाखाली किंवा जेथे ती संस्था आपला व्यवहार किंवा इतर कार्ये करत असेल अशा सर्व ठिकाणी, अशा सर्व कर्मचाऱ्यांनी कोविड अनुरूप वर्तनाचे पालन करण्यासाठी आवश्यक असलेल्या हॅन्ड सॅनिटायझर, साबण व पाणी, तापमापक (thermal scanner), इत्यादी गोष्टी उपलब्ध करण्यासाठी देखील जबाबदार आहेत.

१. नेहमी योग्य पद्धतीने मास्क परिधान करा. नाक व तोंड नेहमी मास्कने झाकलेले असले पाहिजे. (रुमालाला, मास्क समजले जाणार नाही आणि रूमाल वापरणारी व्यक्ती, दंडास पात्र असेल.)
२. जेथे जेथे शक्य असेल तेथे, नेहमी सामाजिक अंतर (६ फूट अंतर) राखा.
३. साबणाने किंवा सॅनिटायझरने वारंवार व स्वच्छपणे हात स्वच्छ धुवा.
४. साबणाने हात न धुता किंवा सॅनिटायझर न वापरता, नाक/डोळे/तोंड यांना स्पर्श करणे टाळा.
५. योग्य श्वसन स्वच्छता(आरोग्य) राखा.
६. पृष्ठभाग नियमितपणे आणि वारंवार स्वच्छ व निर्जंतुक करा.
७. खोकताना किंवा शिंकताना, टिश्यू पेपरचा वापर करून तोंड व नाक झाका आणि वापरलेले टिश्यू पेपर नष्ट करा; जर एखाद्याकडे टिश्यू पेपर नसेल तर, त्याने स्वतःचा हात नव्हे तर, हाताचा वाकवलेला कोपर नाका तोडांवर ठेवून खोकावे व शिंकावे.
८. सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका.
९. सार्वजनिक ठिकाणी गर्दी टाळा आणि सुरक्षित अंतर (६ फूट अंतर) राखा.
१०. कोणालाही शारीरिक स्पर्श न करता, नमस्कार/अभिवादन करा.
११. कोविड-१९ विषाणूचा प्रसार टाळण्यासाठी आवश्यक असलेले अन्य कोणतेही तर्कसंगत वर्तन.

**शास्ती:**

- या नियमांनुसार अपेक्षित असलेल्या कोविड अनुरूप वर्तनाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, असा कसूर केल्याच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये ५००/- इतका दंड करण्यात येईल.
- ज्यांनी, आपले अभ्यागत, ग्राहक, इत्यादींवर कोविड अनुरूप वर्तन लादणे अपेक्षित आहे अशा संस्थेच्या किंवा आस्थापनेच्या कोणत्याही परिवास्तूत (जागेत), जर एखाद्या व्यक्तीने कसूर केल्याचे दिसून आले तर, त्या व्यक्तीवर दंड लादण्याव्यतिरिक्त, अशा संस्थांना किंवा आस्थापनांना सुद्धा रुपये

27/11/21

१०,०००/- इतका दंड करण्यात येईल. जर कोणतीही संस्था किंवा आस्थापना तिचे अभ्यागत, ग्राहक, इत्यादींमध्ये कोविड अनुरूप वर्तन विषयक शिस्त निर्माण करण्याची सुनिश्चित करण्यात नियमितपणे कसूर करीत असल्याचे दिसून आले तर, एक आपत्ती म्हणून कोविड १९-ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, अशी संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.

- जर एखाद्या संस्थेने किंवा आस्थापनेने, स्वतःच कोविड अनुरूप वर्तनाचे (CAB) किंवा प्रमाण कार्यचालन कार्यपद्धतीचे (SOP) पालन करण्यात कसूर केली तर, ती, प्रत्येक प्रसंगी, रूपये ५०,०००/- इतक्या दंडास पात्र असेल. वारंवार कसूर केल्यास, एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत ती संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.
- जर कोणत्याही टॅक्सीमध्ये किंवा खाजगी वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनात किंवा कोणत्याही बसमध्ये, कोविड अनुरूप वर्तनात कसूर केली जात असल्याचे आढळून आले तर, कोविड अनुरूप वर्तनात कसूर करणाऱ्या व्यक्तींना, रूपये ५००/- इतका दंड करण्यात येईल, तसेच सेवा पुरविणारे वाहनचालक, मदतनीस, किंवा वाहक यांना देखील रूपये ५००/- इतका दंड करण्यात येईल. बसेसच्या बाबतीत, मालक परिवहन एजंन्सीस, कसुरीच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये १०,०००/- इतका दंड करण्यात येईल. वारंवार कसूर केल्यास, एक आपत्ती म्हणून कोविड-१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत मालक एजन्सीचे लायसन काढून घेण्यात येईल किंवा तिचे परिचालन बंद करण्यात येईल.
- कोविड अनुरूप वर्तणुकी संबंधीच्या वर नमूद केलेल्या नियमांचे, अनिवार्यपणे पालन करण्यात येईल आणि त्यांचे उल्लंघन केल्यास, वर नमूद केल्यानुसार दंड व शास्ती करण्यात येईल तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ नुसार कोणत्याही आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे, उल्लंघन करणाऱ्यांवर इतर कोणताही दंड किंवा शास्ती लादता येईल. कोविड अनुरूप वर्तनाचे नियम/धोरणे, वरील प्रमाणे असतील आणि त्यामध्ये विशेषरित्या नमूद न केलेले कोविड अनुरूप वर्तनाशी संबंधित असणारे इतर कोणतेही विषय/मुद्दे, राज्य शासनाच्या अंमलात असलेल्या प्रचलित नियमांनुसार/आदेशांनुसार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

27/11/21

**(सीताराम कुंटे)**
**मुख्य सचिव**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management,**
**Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 27th November, 2021**

**ORDER**

---

**Reference:**

a. The Epidemic Diseases Act, 1897

b. The Disaster Management Act, 2005

The State Government is currently recording fewer number of COVID 19 positive cases consistently over the past few months. Also, there has been a steady as well as consistent decline in the trend curve of COVID cases in the country and nearby states. All these succusses are due to discipline in adherence by various establishments to various necessary restrictions that have been imposed on various activities as well as discipline in Covid Appropriate Behaviour shown by majority of public at large. Vaccination drive in the state and the country also has seen reasonable uptake and has contributed immensely to reduction in pressure on health infrastructure, public as well as private. In the light of the said fact the State Government is now considering to open up economic, social, entertainment and cultural activities with fewer restrictions, especially for fully vaccinated persons.

Thus in exercise of the powers conferred under the Disaster Management Act, 2005, the undersigned in the capacity of the Chairperson of the State Executive Committee of the State Disaster Management Authority, in super cession of all earlier orders by the State Government with regard to imposition of restrictions for preventing the transmission of the COVID 19 virus, decrees with immediate effect that all economic, cultural, social, sports and entertainment activities will now be allowed as per the normal timings decided by various local or other competent authorities before the advent of the COVID 19 pandemic, subject to the following conditions:

1. **Adherence to CAB (Covid Appropriate Behaviour)**: Strict adherence to CAB as laid down by the State and Central Government from time to time shall be observed by all, including the service providers, owners of premises, licensees, organizers etc. as well as all visitors, service takers, customers, guests etc. Detailed guidelines for CAB (Covid Appropriate Behaviour) as well as fines in case of breach shall be as per CAB Guidelines and Fines stated hereinafter.

2. **Requirement of being Fully Vaccinated:**

   a. All persons connected with the organization of any program, event or show, ticketed or non-ticketed, as well as all service providers and participants (like players, actors etc.), visitors, guests, customers shall be fully vaccinated as per the definition of the same given hereinafter.

   b. Any shop, establishment, mall, event, gathering etc. where a member of public has a right to come and get services must be manned by fully vaccinated persons and all visitors, customers for such places shall be fully vaccinated.

   c. All public transport shall be used only by fully vaccinated persons.

   d. The Universal Pass created by the State Government (https://epassmsdma.mahait.org or telegram-MahaGovUniversalPass Bot) shall be a valid proof for status of full vaccination. Or else, Cowin Certificate with a valid ID proof carrying photo may be taken a valid proof for the same. For citizens bellow 18 years, other Government or school issued photo identity and for those who are unable to take the vaccine due to medical reasons, a certificate from a certified medical practitioner may serve as documentary evidence for entry.

   e. Though offices and other establishments where there is no visit by any person of general public as well as private transport does not have this requirement of being open to fully vaccinated persons, they are strongly advised to go for full vaccination.

3. **Travel into Maharashtra State**: All travellers into state from any international destination shall be governed by directions of Government of India in this respect. All domestic travellers into the state shall either be fully vaccinated as defined hereinafter or shall carry a RT-PCR test valid for 72 hours.

4. **Restriction on attendance in any program, event etc.:**

   a. In case of any program/ event/ activity happening in an enclosed/ closed space like a cinema hall, theatre, marriage hall, convention hall etc, people up to 50 percent of the capacity of the space will be allowed.

   b. In the case of open to sky spaces, for any events or gatherings, people up to 25 percent of space capacity will be allowed. Concerned DDMA shall have authority to decide the capacity in case of such locations of gatherings or events, if not already declared formally (like stadiums).

c. In the case the total number of people present for any gathering in accordance with the above rules exceeds 1 thousand, then the local disaster management authority will have to be informed of the same and the local disaster management authority may send their representative to supervise as observers any such gathering and to ensure that there is strict adherence to the above mentioned rules. The said representative of DDMA shall have authority to order closure of part or full activity if CAB is seen to be violated in large scale endangering spread of Covid 19.

5. **Other reasonable restrictions by DDMA:** Restrictions and conditions mentioned herein may be augmented, but not diluted, by any DDMA for their respective jurisdiction, if deemed fit at any moment of time, but not without giving 48 hours of information through public notice. Any restrictions that are in force on the date of this order, levied by DDMA shall cease to operate after 48 hours unless re-issued with a public notice for continuation.

6. **Definition of being Fully Vaccinated:**

   A fully vaccinated person will mean-

   - Any person who has received both doses of the vaccine and 14 days have lapsed since the administration of the second dose; or
   - Any person having a medical condition that does not allow him or her to take the vaccine and has a certificate to that extent from a recognised doctor; or
   - A person who is less than 18 years of age.

7. **CAB rules and fines:**

   Definition: *CAB can be defined as the everyday common behaviour needed to be followed by individuals and organisations to curb the spread of the COVID 19 virus and thereby breaking the chain of transmission of the same. Aspects of behaviour that's characterised as CAB include those mentioned below and also all such rational aspects that may hinder spread of Covid 19 virus given its methodology of spread indicated herein.*

   Following are some aspects of basic COVID appropriate behaviour that have to be followed by everyone at all times. All organisations are to ensure that all their employees, visitors to their campuses, customers or anyone engaged in any activity of the organisations, directly or indirectly, follow the same and shall be responsible for enforcing the same on their campus and/ or while transacting the transactions related to business or other activities related to concerned organization. Organisations are also responsible for

availability of hand sanitisers, soap & water, thermal scanners etc. required for following CAB by all such personnel at all such locations that are under its control or where it is transacting its business or other activities.

1. Wear a mask at all times in the right way. Mask should cover nose and mouth at all times. (An handkerchief will not be considered as mask & person using would be liable for fine.)
2. Maintain social distancing (6 feet distance) at all times wherever possible.
3. Wash hands frequently and thoroughly by soaps or sanitisers.
4. Avoid touching nose/ eyes/ mouth without washing your hands with soap or without use of sanitiser.
5. Maintain proper respiratory hygiene.
6. Regularly clean and disinfect frequently cleaned surfaces.
7. When coughing or sneezing, cover the mouth and nose using tissue and throw used tissues in the trash; if one doesn't have tissue, one should cough and sneeze into bent elbow and not one's hand.
8. Do not spit in public places.
9. Avoid crowds and maintain safe distance (*6 feet distance)* in public places.
10. Greet anyone without physical contact.
11. Any other rational behaviour required for avoiding spread of Covid 19 virus.

**Penalties:**

- Any individual not following CAB expected is these rules shall be fined Rs. 500/- for each instance of default.
- If the default by an individual is seen in any premises of organization or establishment that is supposed to impose CAB on their visitors, customers etc., in addition to imposing fine on the individual, these organizations or establishments shall also be fined Rs. 10,000/-. If any organization or establishment is seen to be a regular defaulter in ensuring discipline for CAB in its visitors, customers etc. such organization or establishment shall be closed till the notification of Covid 19 as a disaster remains in force.
- If an organization or establishment fails to follow CAB or SOP itself, it will be liable to be fine of Rs. 50000/- for each instance. Frequent